आजचा सुविचार

''ज्या दिवशी आपले विचार मोठे होतील, त्या दिवशी मोठे मोठे लोक आपला विचार सुरू करतील.''

दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १८७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१८ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## परराज्यातील मध महाराष्ट्रात विक्रीचा बनाव



- राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई
- लाखोंचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१७, पालघर :** परराज्यातील मध महाराष्ट्रात विक्रीसाठी आणून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या टोळीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात मध, बनावट लेबल्स आणि वाहनासह लाखोंचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एक आरोपी ताब्यात घेण्यात आला असून अन्य एक आरोपी फरार असल्याची माहिती समोर आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क, डहाणू व भरारी पथक पालघर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गुजरात राज्यातून महाराष्ट्रात मधाची संशयास्पद वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार विभागाने २३ फेब्रुवारी रोजी सापळा रचून मौजे गणपती मंदिरसमोर, मोवाडा-खडखड रस्त्यावर, देवबंध शिवार (ता. मोखाडा, जि. पालघर) येथे नाकाबंदी करून तपासणी सुरू केली.

दरम्यान, एक महिला पिकअप चारचाकी वाहन (क्र. MH-15/GV-0886) संशयास्पदरीत्या जाताना दिसल्याने वाहन थांबवून तपासणी करण्यात आली. वाहनाच्या मागील बाजूस लोखंडी दरवाजांना कुलूप लावलेले आढळून आले. कुलूप तोडून दरवाजा उघडल्यावर वाहनात परराज्यातील मधाचे मोठ्या प्रमाणावर बॉक्स आढळून आले. प्राथमिक चौकशीत हा मध महाराष्ट्रात प्रतिबंधित असताना दादरा नगर हवेली व दिव-दमण परिसरात विक्रीसाठी नेण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर अधिक चौकशीत संबंधित आरोपीच्या ठिकाणी छापा टाकण्यात आला. तेथे महाराष्ट्रात विक्रीसाठी बनावट लेबल तयार करून परराज्यातील मधाच्या बाटल्यांवर चिकटवले जात असल्याचे उघड झाले. या कारवाईत परराज्यातील मधाचे एकूण ७० बॉक्स, मध वाहतुकीसाठी वापरलेले महिला पिकअप वाहन (MH-15/GV-0886), तसेच विविध नामांकित मधांच्या नावांचे बनावट लेबल्स (सुमारे ९,७०० नग) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे १७,६७,३०० इतकी असल्याचे विभागाने सांगितले.

या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा नोंदविण्यात आला असून एक आरोपी ताब्यात आहे, तर दुसरा फरार असल्याने त्याचा शोध सुरू आहे. ही कारवाई आयुक्त राज्य उत्पादन शुल्क यांच्या मार्गदर्शनाखाली, सहआयुक्त, विभागीय उपायुक्त कोकण विभाग, अधीक्षक पालघर व उपअधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली. कारवाईत निरीक्षक सुनील देशमुख, निरीक्षक अरुण चव्हाण, दुय्यम निरीक्षक विश्वजीत आमले, विकास आव्हाड, अभिजीत मानकर तसेच भरारी पथक व जवानांनी सहभाग घेतला.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास निरीक्षक सुनील देशमुख, राज्य उत्पादन शुल्क, डहाणू विभाग, जि. पालघर करीत आहेत.

## अल्पसंख्याक प्रमाणपत्र घोटाळ्यात मंत्रालयातील उपसचिव रडारवर

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले कठोर कारवाईचे संकेत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यावर शोककळा पसरलेली असताना, मंत्रालयातील अल्पसंख्याक विभागाने ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक प्रमाणपत्र देण्याचा प्रताप केला. त्याची राज्य सरकारने अत्यंत गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये मंत्रालयातील एका उपसचिवाचे नाव समोर आल्याने खळबळ उडाली आहे. ज्यांनी कोणी या प्रक्रियेत अनियमितता किंवा गडबड केली असेल, त्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी दिला.

२८ जानेवारी रोजी अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. संपूर्ण राज्य या धक्क्यातून सावरत असतानाच, अल्पसंख्याक विकास विभागाने मागील ऑगस्टपासून प्रलंबित असलेली ७५ प्रमाणपत्रे अवघ्या काही तासांत वितरित केली. हा प्रकार संशयास्पद वाटल्याने मुख्यमंत्र्यांनी या प्रमाणपत्रांना तात्काळ स्थगिती दिली असून दोषींवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.



### हवामान बदलाचा सामना करण्यासाठी 'मुंबई सज्ज'

मुंबईत मंगळवारपासून देशातील पहिली 'मुंबई क्लायमेट वीक' परिषद जिओ वर्ल्ड सेंटर येथे सुरू झाली. महाराष्ट्र शासन आणि मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले की, हवामान बदलाचा (क्लायमेट चेंज) सामना करताना हवेची आणि पाण्याची गुणवत्ता सुधारून 'लाईफ क्वालिटी' उत्तम करणे हे आमचे लक्ष्य आहे. ही परिषद दरवर्षी मुंबईत आयोजित केली जाईल. या परिषदेसाठी ३५ देशांतील प्रतिनिधी उपस्थित आहेत.

#### 'ग्लोबल इकॉनॉमिक को-ऑपरेशन'चा शुभारंभ

शेती क्षेत्रावर होणारा हवामान बदलाचा परिणाम कमी करण्यासाठी काही प्रभावी मॉडेल्स आणि स्टार्टअप्स या परिषदेत पुढे आले आहेत. याचा राज्यातील बळीराजाला मोठा फायदा होईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, मुंबईत 'ग्लोबल इकॉनॉमिक कोऑपरेशन' या तीन दिवसीय शिखर परिषदेचाही प्रारंभ झाला. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी या परिषदेचे उद्घाटन केले. जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरता आणि नव्या पुरवठा साखळ्या निर्माण करण्याच्या दृष्टीने ही परिषद अत्यंत महत्त्वाची असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. जगभरातील मान्यवर नेते या मंचावरून पुढील तीन दिवस विचारमंथन करणार आहेत.

## धाराशिवच्या वैभवात भर!

» शहरात साकारणार ८९.७६ कोटींचे भव्य सहा मजली जिल्हा न्यायालय



**अक्षराज, विकास वाघ**

**दि. १७, धाराशिव :** आपल्या धाराशिवचा कायापालट होत आहे. जिल्हा मुख्यालय असलेल्या धाराशिव शहराच्या शिरपेचात आता आणखी एक मानाचा तुरा खोवला जाणार आहे. जिल्ह्याच्या वाढत्या विस्ताराचा आणि नागरिकांच्या सोयीसुविधांचा विचार करून, शहरात अत्याधुनिक व नवीन सहा मजली जिल्हा व सत्र न्यायालय इमारत उभारली जाणार आहे. या भव्य प्रकल्पासाठी ८९ कोटी ७६ लाख रुपयांच्या खर्चाला उच्च स्तरीय समितीची मंजुरी मिळाली आहे. तुळजापूर येथील वातानुकूलित न्यायालय इमारती पाठोपाठ आत ही इमारतही जिल्ह्याची ठळक ओळख ठरणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली होणारी ही इमारत पूर्णपणे 'हायटेक' असणार आहे. जुन्या इमारतीची अवस्था पाहता, आता 'तळमजला

### » सहा मजले, १६ कोर्ट आणि प्रशस्त सभागृहाचा समावेश : आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

अधिक ६ मजले' असे सुसज्ज न्यायभवन उभारण्यात येणार आहे. यामध्ये एकूण १६ कोर्ट हॉल असतील, ज्यात विशेष पोक्सो कोर्ट, लोक न्यायालय आणि हाय सिक्युरिटी कोर्टाचाही समावेश असणार आहे. पक्षकार आणि वकिलांच्या सोयीसाठी ३ आणि न्यायाधीशांसाठी स्वतंत्र ३ अशा एकूण ६ लिफ्ट या इमारतीमध्ये बसवण्यात येणार आहेत. सर्वात महत्वाची बाब म्हणजे ही इमारत 'हरित संकल्पनेवर' आधारित असेल. यात सौर ऊर्जा आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगची विशेष तरतूद करण्यात आली आहे. संपूर्ण परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली राहणार असून सक्षम आणि आधुनिक आग प्रतिबंधक यंत्रणाही याठिकाणी बसवली जाणार आहे. प्रशस्त अंतर्गत रस्ते, संरक्षक भिंत, सुसज्ज फर्निचर आणि पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र बोअरवेलची व्यवस्थाही इमारत आराखड्यात करण्यात आली आहे.


### इमारत शहराचे एक महत्त्वाचे 'लँडमार्क' ठरेल, लवकरच कामाला सुरुवात : आमदार पाटील

मुंबई उच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या निकषानुसार व मानांकनानुसार ही इमारत साकारली जाणार आहे. मुंबई येथील मुख्य वास्तुशास्त्रज्ञांनी या इमारतीच्या नकाशांना आणि आराखड्यांना मंजुरीही दिली आहे. एकूण १५ हजार ८२३.६१ चौरस मीटर क्षेत्रफळात ही देखणी आणि भव्य वास्तू उभारली जाणार आहे. ही इमारत शहराचे एक महत्त्वाचे 'लँडमार्क' ठरेल, असा विश्वास असून न्यायालयाच्या या नवीन इमारतीमुळे वकील बांधव आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या हजारो पक्षकारांना हक्काची आणि सोयीची जागा उपलब्ध होणार आहे. कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या तुळजापुर नगरीत संपूर्ण वातानुकूलित न्यायालय इमारतीचे नुकतेच लोकार्पण झाले आहे. आता धाराशिव शहरातही एक भव्य आणि आकर्षक वास्तू लवकरच पहायला मिळणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

## चंद्रपुरातील श्री विठ्ठल मंदिर देवस्थानास 'ब' वर्ग दर्जा प्रदान करण्याची आ. मुनगंटीवारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील श्री विठ्ठल मंदिर देवस्थानास 'ब' वर्ग दर्जा प्रदान करण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे की चंद्रपूर शहराला सुमारे ८०० हून अधिक वर्षांचा समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. गोंड राजवटीपासून भोसलेकालीन परंपरेपर्यंत या शहराने सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक दृष्ट्या उल्लेखनीय प्रगती साधलेली आहे. किल्ले, प्राचीन वास्तू व विविध देवस्थाने ही या शहराची ओळख ठरली आहेत. माता महाकाली, श्री अंचलेश्वर आणि भगवान श्री विठ्ठल ही या शहराची आराध्य आहेत. चंद्रपूर शहरातील श्री विठ्ठल मंदिर हे अत्यंत प्राचीन व



ऐतिहासिक देवस्थान असून, अनेक दशकांपासून भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र राहिले आहे. मंदिर परिसरात वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, भजन व उत्सव आयोजित केले जातात.

दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने मंदिरातून भव्य रथयात्रा काढण्यात येते. हा रथ संपूर्ण शहरातून मार्गक्रमण करतो. या वेळी हजारो भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात. शहरातील विविध भागांतून नागरिक, महिला मंडळे, वारकरी संप्रदायाचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. ही परंपरा अनेक वर्षांपासून अखंडितपणे सुरू असून, शहराच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. विठू नामाचा गजर करत भाविक सतत या मंदिरात येतात. दरवर्षी भाविकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे. उत्सव काळात कायदा-सुव्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा व इतर मूलभूत सुविधांची आवश्यकता भासते. मंदिरास 'ब' वर्ग दर्जा प्राप्त झाल्यास शासन स्तरावरून आर्थिक व प्रशासकीय सहाय्य उपलब्ध होऊन सदर कामे अधिक सक्षमपणे करता येईल. हे मंदिर चंद्रपूर शहरातील नागरिकांचा भावनिक ठेवा आहे, असेही आ. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. श्री विठ्ठल मंदिर देवस्थानास शासनाच्या नियमानुसार 'ब' वर्ग दर्जा प्रदान करण्यात यावा यासाठी चंद्रपूर जिल्हा नियोजन समितीचा ठराव आ. मुनगंटीवार यांच्या विनंती नुसार पारित करण्यात आला आहे.

## वाल्मिकीनगर ग्रामस्थांचे उपोषण लेखी आश्वासनानंतर स्थगित

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१७, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्यातील नवनिर्वाचीत जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांच्या नेतृत्वाखाली वाल्मिकनगर येथील ग्रामस्थांनी दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी केलेले उपोषण प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. सावित्री नदी किनाऱ्यालगत वसलेल्या तालुक्यातील कोळी समाज बांधवाचे एकमेव गाव असलेल्या वाल्मिकीनगर या गावाच्या जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या नळपाणी योजनेचे काम गेल्या तीन वर्षापांसून विविध कारणांनी रखडलेले आहे. गावास सध्या आठ दिवसातून एकदा पाणी पुरवठा होतो आहे. पाण्याची गरज भागवण्यासाठी ग्रामस्थांना खाजगी टँकरने पाणी विकत घेऊन आपल्या नैमित्तीक गरजा पुर्ण कराव्या लागत आहेत. या संदर्भात ग्रामस्थांनी पंचायत समिती मंडणगड व पाणी पुरवठा विभागाकडे



वेळोवेळी लेखी व तोंडी पाठपुरावा करुनही प्रशासनाने समस्येकडे दुर्लक्ष करीत गावास शासकीय टँकरने पाणी पुरवठा करणे शक्य नसल्याचा अहवाल वरिष्ठांकडे पाठवून दिला याचबरोबर नळपाणी योजनेचे कामही सध्या बंद आहे. समस्येने त्रस्त झालेले गावातील पन्नासहुन अधिक महिला व पुरुष ग्रामस्थांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी मंडणगड पंचायत समितीच्या कार्यालयाचे आवारात उपोषणास बसले नवनिर्वाचीत जि.प. सदस्य प्रताप घोसाळकर, सौ. अस्मिता केंद्रे, पंचायत समिती सदस्य अनिल रटाटे, सौ. दीप्ती घडशी, दीपक मालुसरे सौ. प्रणाली चिले माजी सभापती आदेश केणे, नितीन म्हामुणकर, संजय शेडगे, शहरप्रमुख विनोद जाधव, इरफान बुरोंडकर, सिध्देश देशपांडे, अनंत शिंदे, भुपेंद्र बोर्ले, वेसवी ग्रामपंचायत सदस्य आनंद भाटे हे सुध्दा ग्रामस्थांसमवेत उपोषणास बसले व सर्वांनी प्रशासकीय अधिकाऱ्याना चांगलेच धारेवर धरले सुमारे तीन तास हे उपोषण सुरु होते गटविकास अधिकारी सुनील खरात व पाणी पुरवठा अभियंता सौ. जवादे यांच्याशी या विषयावर दीर्घकाळ चर्चा झाली.

# आचरणातही शिवप्रभू दिसतील का ?

तारखेनुसार आणि तिथीनुसार तितक्याच जल्लोषात जयंती साजरी केले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या पाठीवरील एकमेव राजे आहेत. आपल्या अफाट बुद्धीचातुर्याने आणि अतुल पराक्रमाने पाच पातशाह्यांना शह देणाऱ्या. कडे- कपाऱ्यांतील मावळ्यांचे संघटन उभारून हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या महापराक्रमी, महाबली शिवरायांचा वारसा महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राचे परमभाग्यच म्हणावे लागेल. शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलिकडे पोहोचली आहे. जगातील अनेक विद्यापीठांमधून आज शिवरायांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचा इतिहास शिकवला जात आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात. चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे. शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत असतानाचे चित्र आज दिसत आहे. ट्रेन-बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर सर्रासपणे करताना आढळतात. गाड्यांवर लावण्यात आलेले महाराजांच्या प्रतिमेचे अथवा नावाचे स्टिकर म्हणजे खुद्द महाराजच आहेत या भावाने त्याची नियमितपणे स्वच्छता करणारे शिवभक्तही तुलनेने कमीच आहेत. स्वतःला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण रस्त्यावर वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात. गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही



आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही ? जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टीविषयी आपल्यामध्ये तितकेसे गांभीर्य नसले, तरी समाज आपल्याकडे शिवभक्त म्हणून आदराने पाहतो हे ध्यानात ठेवायला हवे. त्यामुळे आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा !

**- जगन घाणेकर**

# भारतीय संघ इतिहास डिफिट आणि रिपीट करणार ?



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

टी २० विश्वचषक स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवत सुपर ८ मध्ये दिमाखात प्रवेश केला. रविवारी झालेल्या सामन्यात भारताने पाकिस्तानला अक्षरशः चारी मुंड्या चीत केले. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रात भारताने पाकिस्तानवर वर्चस्व गाजवत हा सामना जिंकला. या सामन्यात पाकिस्तान भारताच्या जवळपासही पोहचू शकला नाही. हा विजय मिळवून भारताने पाकिस्तानवरील वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. विश्वचषकात पाकिस्तान भारताला फक्त एकदाच हरवू शकला. भारताने मात्र पाकिस्तानला तब्बल ८ वेळा हरवले आहे. या सामन्यात भारताचा सलामीवीर ईशान किशनने वादळी सुरवात करून भारताला पावणे दोनशेचा टप्पा गाठून दिला. त्याने आक्रमक अर्धशतक झळकावले त्याला सूर्यकुमार यादव, शिवम दुबे, तिलक वर्मा, रिंकू सिंग यांनी चांगली साथ दिली. भारतीय गोलंदाजांनी तर कमाल केली. भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानच्या फलंदाजानी अक्षरशः नांगी टाकली. त्यांचा कोणताच फलंदाज भारतीय गोलंदाजीपुढे टिकू शकला नाही. जसप्रीत बुमरा, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव या भारताच्या सर्व प्रमुख गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करून पाकिस्तानी फलंदाजांना जेरीस आणले. पाकिस्तानचे फलंदाज कसेबसे शतक पार करून शकले. पाकिस्ताला नमवण्यापूर्वी भारताने अमेरिका आणि नामिबियालाही असेच एकतर्फी नमवून विजय मिळवला होता. आज भारताचा नेदरलँडशी मुकाबला आहे. हा मुकाबला ही भारत एकतर्फी जिंकेल यात शंका नाही. आता भारत सुपर ८ मध्ये पोहचला आहे. विश्वचषकाची खरी लढाई आता सुरू झाली आहे असे म्हणावे लागेल कारण जगातील सर्वोत्तम आठ संघ सुपर ८ मध्ये असतील. तिथे लढाई सोपी नसेल कारण सर्वच संघ जिंकण्यासाठी खेळतील. टी २० क्रिकेटमध्ये कोण जिंकेल हे कोणीच छातीठोकपणे सांगू शकत नाही कारण एखादे चांगले षटक किंवा एखादी छोटी पण महत्वपूर्ण खेळी सामन्याचे चित्र पालटवते पण सध्याचा फॉर्म पाहता भारत, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडीज या संघांना उपांत्य फेरीत पोहचण्याची संधी आहे. न्यूझीलंडही उपान्त्य फेरीत पोहचू शकतो. हेच संघ विजेतेपदाचे दावेदार आहेत मात्र भारत हा विजेतेपदाचा प्रबळ दावेदार आहे कारण या सर्व संघात भारतीय संघ तुफान फॉर्मात आहे. भारताची फलंदाजी इतर कोणत्याही देशांच्या फलंदाजी पेक्षा बळकट आहे. भारताचे गोलंदाजही लयीत आहेत. भारताचे वेगवान गोलंदाज असोत की फिरकी गोलंदाज सर्वच प्रतिस्पर्धी फलंदाजावर भारी पडत आहे. भारताचे क्षेत्ररक्षणही चांगले होत आहे. सूर्यकुमार यादव हा या संघाचे नेतृत्व कुशलतेने करत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे भारत आपल्या प्रेक्षकांसमोर आणि घरच्या मैदानावर खेळत आहे त्यामुळे त्याचा फायदा भारतीय संघाला मिळत आहे. याचाच अर्थ सर्व परिस्थिती भारतासाठी अनुकूल आहे. भारतीय संघाने या अनुकूल परिस्थितीचा फायदा उचलून संघाला विश्वविजयी करावे अशी अपेक्षा देशातील १४५ कोटी जनता करत आहे. भारताने जर तसे केले तर इतिहास घडेल. जर भारताने हा विश्वचषक जिंकला तर तीनवेळा विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरेल. याआधी असा पराक्रम कोणत्याही संघाने केला नाही याचाच अर्थ भारत इतिहास डिफिट करेल शिवाय सलग दोनदा विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरेल. म्हणजेच सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकून भारत इतिहासाची पुनरावृत्ती करेल म्हणजेच इतिहास रिपीट करेल. इतिहास डिफिट आणि रिपीट करण्यासाठी भारतीय संघाला मनापासून शुभेच्छा!

# प्रतिष्ठा खोटी, माणुसकी मोठी...

- बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर
जि.लातूर. मो.९५४५४४२६४८

माणुसकीला पायदळी तुडवून प्रतिष्ठित व्यक्ती होता येत नाही. इतिहास साक्षीला आहे,अनेक ग्रंथात व पुस्तकांत दाखले दिले गेले आहेत,आणि काही वडिलधारी मंडळी नेहमीच सांगतात की ज्यांनी ज्यांनी माणुसकीला पायदळी तुडवून प्रतिष्ठित होण्याचा प्रयत्न केला होता त्या सर्वांची धुळधाण झाली होती.त्यांचे अस्तित्व नष्ट झाले होते.म्हणून प्रतिष्ठा मिळवायची असेल,समाजात प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून नावारूपाला यायचे असेल तर माणुसकीला जपायलाच हवे. माणुसकीला लाथाडून प्रतिष्ठा मिळत नाही.बावनकशी सोने असलेल्या माणुसकीपुढे खोटी प्रतिष्ठा कधीच टिकत नाही. आज बहुतांश लोक माणुसकीला डावलून प्रतिष्ठा वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न करताना दिसतात.

कोणी हायफाय घर बांधतात, कोणी महागडी आलिशान कार घेतात,कोणी हाताच्या सर्व बोटांत अंगठ्या घालतात,कोणी हायफाय फॅशनेबल कपडे नेसतात आणि कोणी आपण फार मोठे आहोत हे दाखवून प्रतिष्ठा वाढवण्याचा प्रयत्न करतात.काहींचे व्यसने आणि कारनामे सुध्दा हायफाय असतात.अशा मानसिकतेचे लोक स्वतःला फार प्रतिष्ठित व्यक्ती समजतात. परंतु,त्यांचा व त्यांच्या प्रतिष्ठेचा माणुसकीशी काही एक संबंध नसतो.असे लोक दुसऱ्यांची संपत्ती हडप करून श्रीमंत झालेले असतात. रक्तांच्या नातलगांना त्रास देऊन स्वतः सुखी होतात.स्वत:ला प्रतिष्ठित समजणाऱ्या अनेकांचे आईवडील गावाकडे मोडक्या घरात कसेबसे जीवन कंठत असतात,काहींचे आईवडील चक्क वृध्दाश्रमात भरती झालेले असतात.अपशब्द वापरून ह्यांनी आपल्या बहिण भावांचे मन दुखावलेले असते.गोरगरीबांची खिल्ली उडविलेली असते.

गोरगरीबांच्या इज्जतीचे लक्तरे करून, गोरगरीबांना कमी लेखून, त्यांच्या हिश्श्याचे लुबाडून खाऊन श्रीमंत होता येते पण प्रतिष्ठा मात्र कवडीमोल होते.अशा खोट्या प्रतिष्ठेच्या लोकांना लोक तोंडावर गोड बोलतात पण त्यांच्या पश्चात त्यांच्या नावाने बोटे मोडतात,श्राप देतात.टि.व्ही.वरील मालिकांमध्ये आणि बऱ्याच चित्रपटांमध्ये आपण पाहतो की गोरगरीब जनतेला छळणारे,नाहक त्रास देणारे, फसवून संपत्ती लुटणारे लोक खोट्या प्रतिष्ठेच्या डोलाऱ्यावर विराजमान होतात.पण एकवेळ अशी येते की त्यांची खोटी प्रतिष्ठा, संपत्ती आणि श्रीमंतीची ऐट एका क्षणात नाहीसे होतात.त्यांची ती दिखाऊ व खोटी प्रतिष्ठा क्षणात धुळीला मिळते.ते रावांचे रंक बनतात.म्हणून माणुसकीला न जुमानणाऱ्या आणि माणुसकीचा घात करणाऱ्या लोकांना कोणीही प्रतिष्ठित समजत नाही.खोट्या प्रतिष्ठेमुळे चारचौघांत मान सन्मान मिळतो पण तो चिरकाळ टिकणारा नसतो.लोकांना सत्य काय आहे ते चांगले कळते.

ज्या लोकांचे कर्म चांगले असते, जे लोक प्रामाणिक असतात,ज्यांचे चारित्र्य उत्तम असते,जे लोक गरीबांना सढळ हाताने मदत करतात आणि जे लोक मानवतेची पूजा करतात त्या लोकांची प्रतिष्ठा ही चिरकाळ टिकणारी व खरोखर लाखमोलाची असते.संत,महात्मे, समाजसुधारक,महामानव व थोर विचारवंत यांच्या विचारांची कास धरून लोकहितासाठी व लोकांच्या कल्याणासाठी अद्वितीय कार्य करणाऱ्या व्यक्तींची प्रतिष्ठा ही खरोखरच वंदनीय असते.म्हणून चांगले कार्य करा,चांगले वर्तन ठेवा, माणुसकीला जपा,नियत चांगली ठेवा,चांगले विचार आत्मसात करा आणि सर्वांशी गोड बोला व व्यवहार नेक ठेवा.समाजात तुमची प्रतिष्ठा आपोआप वाढेल आणि ती प्रतिष्ठा कायम टिकेल.तुमच्या त्या चांगल्या प्रतिष्ठेला लोक सलाम करत राहतील.

## तुलना ..

महा पुरुषांशी कुणां
करतो उगाचं तुलना
न कळत शब्द घसरे
करु बसे अवहेलना

भडकू लागते दंगली
ठिणगी पुरी ज्वलना
आधीचं रे विस्पोटक
तीव्र धार्मिक भावना
उगाचं काढ कुरापती
शांती मुळी पाहवेना
घसरे माझा टिआरपी
स्वस्थ काही राहवेना
सळसळ फिरे जिव्हा

सारखी चाले वल्गना
उद्रेक होणारं भलता
संपूर्ण असते कल्पना
बातमी विस्पारी डोळे
असाच रंगूद्या सामना

ब्रेकिंग न्यूज रंगताना
परि पूर्ण मनो कामना
कष्टाची राष्ट्रीय संपदा
नष्टकरतोय संसाधना

फायदे वैयक्तिक पाहे
भ्रष्ट नष्ट सारी साधना
न कारात्मक दुर्विचार
धुळीस मिळवे वारसा
तरी ही मना ना वेदना
बोथट मानवीसंवेदना

- हेमंत मुसरीफ, पुणे.
९७३०३०६९९६

# कलेचे मूल्य

हजार बाराशे वस्तीचं एक गाव होतं. गाव तसं सधन होतं. त्यांना त्यांच्या गावातल्या एका पुढाऱ्याचा पुतळा बनवायचा होता. म्हणून ते एका चांगल्या शिल्पकाराच्या शोधात होते. त्यासाठी त्यांनी गावाचं एक शिष्टमंडळ नेमलं होतं. एके दिवशी ते शिष्टमंडळ एका शिल्पशाळेत गेलं. तिथे अनेक मूर्ती, पुतळे ओळीने मांडले होते. ते पुतळे, तिथल्या मूर्ती खूपच छान होत्या. शिल्पकाराची कारागिरी बघून शिष्टमंडळ खूश झालं. त्यांनी ठरवलं की, याच शिल्पकाराला पुतळा बनवायला द्यायचं. मग दिवाणखान्यात दोघांची बोलणी सुरू झाली.

शिष्टमंडळात, सरपंच, दोन प्रतिष्ठित गावकरी, शाळेचे मुख्याध्यापक अशी मंडळी होती. आता चर्चा सुरू झाली. कोणाचा पुतळा बनवायचा आहे. कशा पद्धतीनं बनवायचा आहे. हे हळूहळू ठरत होतं. किती फुटांचा हवा? कुठे बसवणार? इतकी सारी इत्थंभुत माहिती त्यांनी शिल्पकाराला पुरवली.

शिल्पकार अगदी मन लावून ऐकत होता. शेवटी चर्चेची गाडी पैशावर आली. किती पैसे घेणार आपण? असं विचारल्यावर शिल्पकारानं कोणताही विचार न करता सरळ सांगून टाकलं की या पुतळ्याची मी पाच लाख रुपये बिदागी म्हणून घेणार. इतके पैसे ऐकल्यानंतर शिष्टमंडळातील अनेकांचे डोळे विस्फारले. त्यातला एक प्रतिनिधी अक्षरशः काय एवढे पैसे! असे ओरडलाच! त्यांच्याकडे पाहत शिल्पकार म्हणाले, होय एवढेच पैसे मी आपणाकडून घेणार! त्यात एका पैशाची सूट मिळणार नाही.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### भक्ती, साधना आणि आत्मशुध्दीचा संदेश देणारी महाशिवरात्र : प्रेमानंद आंबेकर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** महाशिवरात्री हा फक्त सण नसून आत्मचिंतन, भक्ती आणि साधनेचा दिवस आहे. भगवान शंकर साधेपणा,त्याग आणि करुणेचे प्रतीक आहेत, असं प्रतिपादन प्रेमानंद महाराज आंबेकर (शास्त्री) यांनी केले. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील प्रसिद्ध पांडवकालीन श्री क्षेत्र ढोकेश्वर महादेव देवस्थान येथे टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने महाशिवरात्री उत्सवानिमित्त सालाबादप्रमाणे यंदा १३ व्या वर्षी आयोजित किर्तन सेवेत ते बोलत होते.

पुढे बोलताना आंबेकर शास्त्री म्हणाले की, महाशिवरात्रीच्या दिवशी जागरण आणि उपवास केले जातात मात्र केवळ शरीराचा उपवास न करता मनातील वाईट विचारांचा उपवास करणे अधिक महत्त्वाचे आहे. राग मत्सर आणि द्वेष सोडून प्रेम,दया व क्षमा यांचा स्वीकार केल्यास शिवतत्त्व आपल्या जीवनात उतरते. असल्याचे प्रेमानंद महाराज यांनी काल्याच्या कीर्तनात अत्यंत भक्तिभावात सांगितले. यावेळी उपस्थित भाविकांनी कीर्तनाचा मनोभावे आस्वाद घेतला. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. उशिरा पर्यंत भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. महाशिवरात्री निमित्त आयोजित या कीर्तन महोत्सवाला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आध्यात्मिक लाभ घेतला.

# हेल्मेट न वापरणाऱ्या ५४ दुचाकीस्वारांवर कारवाई

## राहुरी पोलिसांकडून ४६ हजारांचा दंड

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१७, राहुरी (अहिल्यानगर) :** प्राणांतिक अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राहुरी पोलीस स्टेशनकडून हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीस्वारांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. अपर पोलीस महासंचालक श्री. कृष्ण प्रकाश यांच्या सूचनेनुसार तसेच पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे यांच्या निर्देशानुसार दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत हेल्मेट न वापरणाऱ्या ५४ दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन एकूण ४६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.



राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत सन २०२४ मध्ये ५७ तर सन २०२५ मध्ये ५८ प्राणांतिक अपघात झाले असून गेल्या दोन वर्षांत सुमारे ११५ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या अपघातांमध्ये बहुतांश मृत्यू दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर न केल्यामुळे झाल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे अपघातातील मृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

नगर-मनमाड महामार्गावर प्रवास करताना दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करून स्वतः च्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी, असे आवाहन राहुरी पोलिसांकडून करण्यात आले आहे. पुढील काळातही अशा प्रकारची कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, वाहतूक शाखेचे सहाय्यक फौजदार भाऊसाहेब आव्हाड तसेच पोलीस हवालदार संतोष ठोंबरे, रमेश दरेकर व बापू फुलमाळी यांनी केली.

### आत्मविश्वास नगरात ९० व्या महाशिवरात्री निमित्त

## भव्य शिवध्वजारोहण सोहळा उत्साहात संपन्न

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१७, सोलापूर :** ब्रह्माकुमारी संस्था यांच्या लाईट हाऊस सेवाकेंद्र, आत्मविश्वास नगर येथे ९० व्या महाशिवरात्री निमित्त आयोजित करण्यात आलेला शिवध्वजारोहण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. संपूर्ण परिसर 'ॐ शांती'च्या घोषणांनी आणि शिवभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला.



या कार्यक्रमाला ज्ञानेश्वरी ताई देवकर, महेश देवकर, आरती ताई वाकसे, उद्योगपती अक्षय वाकसे तसेच विजापूर नाका पोलीस चौकीचे पोलीस सब इन्स्पेक्टर मोहन पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

महापौर ज्ञानेश्वरी ताई देवकर आणि नगरसेविका आरती ताई वाकसे यांच्या शुभहस्ते शिवध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. मान्यवरांचा सत्कार बी.के. बाळू भाई, बी.के. उज्वाला दीदी, सदीक्षा दीदी, सावित्री दीदी तसेच परांडा सेंटरच्या महादेवी दीदी यांच्या हस्ते करण्यात आला.

पोलीस उपनिरीक्षक मोहन पवार यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, अत्यंत कमी वेळेत मिळालेला हा अनुभव मनाला आत्मशांती देणारा आहे. कामाच्या ताणतणावातून मुक्त होण्यासाठी मेडिटेशन अत्यंत उपयुक्त ठरते. त्यांच्या या मनोगताने उपस्थितांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

सोलापूर येथील ब्रह्माकुमारी संस्थेच्या संचालिका बी.के. सोमप्रभा दीदी यांनी महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व विशद करताना सांगितले की, हा दिवस आत्मजागृतीचा, शांतीचा आणि जीवनात नवचैतन्य निर्माण करणारा आहे. बी.के. उज्वाला दीदी यांनी संस्थेच्या विविध सेवाकार्यांची माहिती देत समाजपरिवर्तनासाठी चालणाऱ्या उपक्रमांचा आढावा दिला.

उद्योगपती अक्षय वाकसे यांनी आपल्या मनोगतातून सर्वांची मने जिंकली. वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी शिवबाबांचा परिचय झाल्याची आणि त्यातून मिळालेल्या अनुभूतीची त्यांनी भावनिक आठवण सांगितली. आजही त्याच सकारात्मक विचारांनी जनतेची सेवा करण्याचा संकल्प आहे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ब्रह्माकुमारी लाईट हाऊस परिवारातील पुजारी माता, हिबारे माता, नागमनी दीदी, शोभा माता, वैरागकर माता, निकिता माता, तेजश्री बहन, मंगल दीदी, अश्विनी बहन तसेच पुजारी भाई, महादेव भाई, योगेश भाई, किशोर भाई, आदित्य भाई, अमर भाई पुजारी, फरिष्ता भाई, शिवम भाई, मस्के भाई, शिवशंकर भाई आदींनी परिश्रम घेतले. महाशिवरात्रीच्या या पवित्र पर्वावर आयोजित शिवध्वजारोहण सोहळ्याने आत्मविश्वास नगर परिसरात आध्यात्मिक ऊर्जा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. उपस्थितांनी कार्यक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा प्रेरणादायी उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली.

## नॅशनल हायस्कूल मांदिवलीमध्ये दहावी निरोप समारंभ

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.१७, दापोली (रत्नागिरी) :**

एम दि यंग पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई संचलित नॅशनल हायस्कूल मांदिवलीत दहावी निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम अध्यक्ष शालेय समिती चेअरमन नूर मोहम्मद मुकादम हे होते. कार्यक्रमाची सुरुवात फैजान करीम मुकादम याच्या कुराण पठणाने झाली. दानियाल आसीफ मुकादम व उमर इम्तियाज मुकादम यांनी हमद तर इरहम इनायत फकी हिने नात सादर केली.

शाळेचे मुख्याध्यापक फैयाज सर यांनी कार्यक्रम प्रास्ताविक, मान्यवरांचे स्वागत व शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला.

आठवीचे मरीयम वलेले, उमर मुकादम, निहीला मुकादम यानी, नववीचे फातीमा अलवारे, अफशीन खान, यांनी भाषण केले तर दहावीचे इबतिसाम वलेले, इरम वस्ता, मनाल मुकादम, तोसीफ मुकादम, जमान खमशे, मुस्तकिम मुकादम, जुबिया दिवेकर यांनी आपले भावनाप्रधान मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक फैयाज सर, शालेय समिती सदस्य गुलाम हुसैन भारदे, नॅशनल हायस्कूल लाटवण चे मोअजजम सर, नॅशनल हायस्कूल मंडणगड चे मोहम्मद शारीक सर, शाळेचे शिक्षक परकार सर, जमादार सर, फहीमा मॅडम यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी शालेय क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी, १००% उपस्थिती मध्ये आठवीचा उमर मुकादम, दहावीचे इबतिसाम वलेले, इरम वस्ता, तोसीफ मुकादम, शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ठ इबतिसाम वलेले, सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ठ मनाल मुकादम व इरम वस्ता, जमान खमशे यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रम अध्यक्ष शालेय समिती चेअरमन नूर मोहम्मद मुकादम यांनी अध्यक्षीय भाषणातून गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून मार्गदर्शन केले.

कार्यक्रम सूत्रसंचालन मुख्याध्यापक फैयाज सर व जमादार सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेबददल संस्था अध्यक्ष उस्मान मालवणकर, उपाध्यक्ष डॉ. अजीज सावंत, सचिव अ.कादीर खांचे, सहसचिव अस्लम जुवळे, शालेय समिती चेअरमन नूर मोहम्मद मुकादम, व्हाईस चेअरमन इक्बाल मुकादम, सदस्य जमालुददीन मुकादम, गुलाम हुसैन भारदे, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष फौजान पोफलूनकर, मांदिवली जमात अध्यक्ष बिलाल मुकादम आदींनी अभिनंदन केले.

## चेरवली शाळेची विद्यार्थिनी मनस्वी फर्डे वक्तृत्व स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१७, शहापूर (ठाणे) :** 'विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास' हे शिक्षणाचे ध्येय साध्य करण्याच्या उद्देशाने गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने दरवर्षी जिल्हास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धांचे आयोजन केले जाते. यासाठी केंद्रस्तर,विभागस्तर, तालुकास्तर आणि जिल्हास्तर अशा चार टप्प्यांतून स्पर्धा संपन्न होत असतात. या स्पर्धांचा अंतिम टप्पा दिनांक १३ फेब्रुवारी रोजी द लोढा वर्ल्ड स्कूल, पलावा सिटी, डोंबिवली या ठिकाणी संपन्न झाला. या स्पर्धांतर्गत संपन्न झालेल्या लहान गट वक्तृत्व स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद शाळा चेरवलीची विद्यार्थिनी मनस्वी तानाजी फर्डे हिने प्रथम क्रमांक पटकावल्याने शिक्षणाधिकारी श्री. बाळासाहेब राक्षे साहेब, शिक्षण विस्ताराधिकारी श्री. आशिष झुंजारराव साहेब, जिल्हा समन्वयकभरत वेखंडे साहेब, कल्याण तालुका गट शिक्षणाधिकारी सौ. सुनिता मोटघरे मॅडम,वेतन अधिक्षक श्री.संभाजी पवार साहेब यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.





हे यश संपदान करताना शाळेचे मुख्याध्यापक कैलास दिनकर सर, प्रविण वेखंडे सर, अंबिका मिसाळ मॅडम, मदन देसले सर,स्वाती वेखंडे मॅडम यांनी यशस्वी मार्गदर्शकाची भूमिका बजावली.

प्राथमिक स्तरावर अतिशय महत्त्वपूर्ण समजली जाणारी होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेतील यशस्वी निकालानंतर विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये शाळेने केलेली कामगिरी निश्चितच अभिमानास्पद आहे.त्याबद्दल मनस्वी तसेच शाळेचे सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे. या यशात मार्गदर्शन करणारे शहापूर तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री.हिराजी वेखंडे साहेब, शिक्षण विस्ताराधिकारी सौ.संगीता माळी मॅडम, सौ. करुणा भडांगे मॅडम, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री अनिल फर्डे, सर्व सन्माननीय सदस्य व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे शिक्षकवृंदांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले. या यशामुळे चेरवली ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण पहायला मिळाले.

# बदलत्या वातावरणाचा फटका आंबा उत्पादनावर होण्याची शक्यता

## ढगाळ वातावरणामुळे आंबा, काजू पिकांवर कीड व रोग प्रादुर्भाव होण्याची शक्यता



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१७, पेण (रायगड) :** गेल्या आठवडाभरापासून पडत असलेली कडाक्याची थंडी अचानक पणे गायब झाल्याने हवामानात झालेल्या बदलामुळे जिल्ह्यात ढगाळ वातावरण आहे त्यामुळे आंबा व काजू फळावर हवामानात झालेल्या बदलामुळे फटका बसण्याची शक्यता ना करता येत नाही जर या पुढे सुध्दा जर जिल्ह्यात ढगाळ वातावरण राहिल्यास कीड व रोग तसेच फळ गळ होऊन शेतकऱ्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही .

पेणमधे गेल्या आठवड्याभरापासून अशाप्रकारे वातावरणात बदलामुळे पेण तालुक्यातील शेतकरी धास्तवले आहे सध्या पेण तालुक्यात आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी साधारणपणे ८०० हेक्टर क्षेत्रावर आंबा पिकाची लागवड आहेत.तालुक्यातील काही ठिकाणी आंबा तयार होण्यास सुरुवात झाली आहे तर काही ठिकाणी आंबे वाटाणे इतके तयार झाले आहे त्यामुळे काही शेतकऱ्यांचे लवकरच स्थानिक आंबा बाजारात येण्याच्या वेळेत आहेत.

पेण तालुक्यत काळ्याकुट्ट ढगांनी आभाळ भरुन येते, डिसेंबर महिन्यापासून आंब्याला चांगला मोहोर येऊन फळ सुध्दा चागल्या प्रकारे झाले आहेत ढगाळ वातावरण असच राहिल्यास आंबा व काजू पिकावर कीड व रोगाचा प्रादूर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत.

पेण तालुका कृषी विभागाच्या नोंदीनुसार पेण ग्रामीण भागात तब्बल ७९५ ते ८०० हेक्टरावर आंबा फळबाग लागवड केली आहे .गेले आठवड्याभरापासून नैसर्गिक वातावरणात घडलेला बदल असाच सुरू राहिला तर आंबा फळावर मोठ्या प्रमाणात गळण्याची शक्यता शेतकरी बांधवांनी व्यक्त केली आहे.

● सध्या परिस्थितीमध्ये ढगाळ वातावरणयामुळे वातावरण कीड व रोगास पोषक झाले आहे. त्यामुळे पुढील काही दिवसात व तुडतुडे किडीचा व बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी बागेत वेलीच निरीक्षण करून तज्ञांच्या सल्ल्याने किड व रोगाच्या नियंत्रणासाठी कीटकनाशक व बुरशीनाशक यांची फवारणी करावी.

**डॉ जीवन आरेकर– कृषी विज्ञान केंद्र, रोहा**

● गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्याने अनेक ठिकाणी आंबा पिकावर तुडतुडे कीड व रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे त्यामुळे वातावरणाचा फटका आंबा फळावर बसण्याची शक्यता आहे त्यामुळे पुन्हा किडी व रोग नियंत्रणासाठी फवारणी करावी लागणार आहे.

**सचिन जगताप – प्रगतशील आंबा बागायदार, पेण**

अक्षराज



# खापरखेड्यात शिव भक्तीचा महापूर !



➤ 'हर हर महादेव'च्या जयघोषात निघाली भव्य शोभायात्रा

➤ रस्त्याच्या दुतर्फा हजारो नागरिकांची गर्दी

➤ 'बाबा बर्फानी'ची प्रतिकृती ठरली आकर्षणाचे केंद्र

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** सत्यम शिवम सुंदरम, 'शिव हि सत्य है, सत्य हि शिव है...याचाच प्रत्यय १५ फेब्रुवारी रविवारला खापरखेडा वासीयांना बघायला मिळाला. श्री राम दरबार मंदिर समितीच्या वतीने महाशिवरात्री निमित्त आयोजित भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तयावेळी संपूर्ण खापरखेडा नगरी 'हर हर महादेव' व 'जय महाकाल'च्या जयघोषाने दुमदुमून गेली होती. याप्रसंगी भक्ती उत्साह आणि शिस्तीचा त्रिवेणी संगम या सोहळ्यात पाहायला मिळाला.

शोभायात्रेचे मुख्य आकर्षण भगवान शंकर, माता पार्वती आणि शिवगणांचे हुबेहूब जिवंत देखावे होते विशेषतः बर्फापासून साकारलेली 'बाबा बर्फानी' यांची प्रतिकृती पाहण्यासाठी भाविकांनी एकच गर्दी केली होती.

# खिशात पैसा नाही, पण उरात जिद्द; व्यसनमुक्तीसाठी सुमितची सायकलवारी!

## ६ महिन्यांत १२ राज्यांचा प्रवास पूर्ण

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** व्यसनाधिनतेच्या विळख्यात अडकत चाललेल्या तरुण पिढीला नवी दिशा देण्यासाठी उत्तराखंडमधील १९ वर्षीय सुमित राजबर याने सायकलवरून भारतभ्रमंतीचा विडा उचलला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या या प्रवासात सुमितने आतापर्यंत १२ राज्यांचा टप्पा पार केला असून, सध्या तो महाराष्ट्रात दाखल झाला आहे.

**शून्यातून प्रवासाची सुरुवात**

उत्तराखंडच्या उधमसिंहनगर जिल्ह्यातील खटीमा गावचा रहिवासी असलेल्या सुमितने अवघ्या १२ वीपर्यंत शिक्षण घेतले आहे. समाजात वाढती व्यसनाधिनता पाहून त्याने जनजागृती करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे, २६ ऑगस्ट २०२५ रोजी



खिशात एक रुपयाही न घेता, केवळ जिद्दीच्या जोरावर त्याने सायकलवरून हा प्रवास सुरू केला.

**१२ राज्यांचा थरारक प्रवास**

आपल्या सायकलवर कपडे, बॅटरी आणि राहण्यासाठी टेंट घेऊन निघालेल्या सुमितने आतापर्यंत:

उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश, तेलंगणा.

तमिळनाडू, केरळ आणि कर्नाटक या राज्यांचा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे.

महाराष्ट्रात आल्यावर त्याने घृष्णेश्वर आणि त्र्यंबकेश्वर या ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतले. महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर निफाड तालुक्यातील कोठुरे येथील बाणेश्वर मंदिरात मुक्कामी असताना त्याची स्थानिकांनी भेट घेतली.

> महाराष्ट्राची साधनसंपदा आणि येथील प्रेमळ माणसे प्रेरणादायी आहेत. प्रवासात ऊन, वारा, पावसाचे अनेक कष्ट सोसले, पण व्यसनमुक्तीचा ध्यास सुटलेला नाही. भारताचा प्रवास पूर्ण झाल्यावर सायकलवर जगभ्रमंती करण्याची माझी तयारी आहे.
>
> **सुमित राजबर**
> **युवा सायकलपटू)**

**असा असतो दिनक्रम**

सुमितचा प्रवास शिस्तबद्ध आहे. दररोज सकाळी सायकल प्रवास सुरू करणे, वाटेत मिळेल तिथे नैसर्गिक स्रोतांवर स्नान उरकणे आणि गावोगावी थांबून तरुणांशी व्यसनमुक्तीबाबत संवाद साधणे, असा त्याचा नित्यक्रम आहे. वाटेत नागरिक स्वेच्छेने जी मदत करतील, तिचा स्वीकार करत तो आपला प्रवास पुढे चालू ठेवतो. सायंकाळी मंदिर किंवा समाजमंदिरात तो मुक्काम करतो.

**निफाड सायकलिस्टकडून गौरव**

सुमितच्या या साहसाचे निफाड सायकलिस्टच्या वतीने कौतुक करण्यात आले. यावेळी प्रवीण तनपुरे, अॅड. रामनाथ शिंदे, संदीप गवळी, कैलास भागवत, अथर्व नकाते आदींनी सुमितची भेट घेऊन त्याला पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. कोठुरे येथील मुक्कामानंतर तो आता गुजरात राज्याकडे प्रस्थान करणार आहे.

# 'अम्मा की पढाई' ही केवळ शिक्षण देणारी संस्था नाही तर आशेचा किरण : आ. जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** गरिब व गरजू विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शैक्षणिक मार्गदर्शन मिळावे आणि त्यांनी शासकीय सेवेत रुजू व्हावे या उद्देशाने आ. किशोर जोरगेवार यांनी सुरू केलेल्या 'अम्मा की पढाई' शिक्षण केंद्रातील विद्यार्थी मयूर विकास चौधरी याची केंद्रीय राखीव पोलिस दलात नियुक्ती झाली आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. स्पर्धा परीक्षांचे वाढते आव्हान आणि महागड्या खासगी प्रशिक्षणवर्गांमुळे अनेक होतकरू विद्यार्थ्यांची स्वप्ने अपुरी राहतात. ही बाब लक्षात घेऊन आ. किशोर जोरगेवार यांनी 'अम्मा की पढाई' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. वर्षभरापूर्वी सुरू झालेल्या या उपक्रमात गट ब व गट क सेवांसाठी विनामूल्य मार्गदर्शन दिले जाते.

सध्या २८४ विद्यार्थी या उपक्रमाचा लाभ घेत असून त्यांना आधुनिक पद्धतीने लेखी तसेच मैदानी चाचण्यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. यापूर्वी या केंद्रातील सचिन लाकडे याची राज्यकर निरीक्षक पदावर नियुक्ती झाली होती. त्यातच आता गोंडपिपरी तालुक्यातील गरिब कुटुंबातील मयूर विकास चौधरी याने कर्मचारी निवड



आयोगाच्या जीडी परीक्षेत यश संपादन करून केंद्रीय राखीव पोलिस दलात स्थान मिळविले आहे. मागील वर्षभर तो 'अम्मा की पढाई' केंद्रात नियमित प्रशिक्षण घेत होता. मयूरसारख्या विद्यार्थ्यांनी संकटांवर मात करत, प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत मिळवलेले हे यश प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करणे, घरची परिस्थिती बदलणे आणि देशसेवेचा मार्ग स्वीकारणे- यापेक्षा मोठा अभिमान दुसरा नाही, आज मयूर केवळ आपल्या कुटुंबाचे नाही, तर संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करत आहे.

# थोडक्यात

## वागळे इस्टेट मधील नीलम अपार्टमेंटमध्ये स्लॅब कोसळून तीन जण जखमी

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१७, शांतीनगर (ठाणे) :** आज पहाटे ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरात एक गंभीर दुर्घटना घडली. शांतीनगर येथील नीलम अपार्टमेंटमधील ए विंगच्या पाचव्या मजल्यावरील स्लॅब अचानक कोसळल्याने मोठी खळबळ उडाली. या दुर्घटनेत तीन जण जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

स्लॅब कोसळल्याचा आवाज मोठा असल्याने परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच प्रशासन व मनसेचे स्थानिक कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले. या दुर्घटनेची माहिती कळताच मनसेचे कोपरी-पाचपाखाडी विभागाचे अध्यक्ष संदीप साळुंखे तसेच मनसे महिला ठाणे शहर सचिव स्मिता साळवी यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली. त्यांनी जखमी नागरिकांची आस्थेने विचारपूस करत उपचाराबाबत डॉक्टरांकडून माहिती घेतली तसेच आवश्यक ती मदत तत्काळ उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, सदर इमारतीच्या बांधकामाच्या दर्जाबाबत आणि देखभालीबाबत प्रश्न उपस्थित होत असून संबंधित यंत्रणेकडून तपास करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## महाशिवरात्री व शिवजयंतीनिमित्त सोमेश्वर येथे रक्तदान शिबिर

**अक्षराज : शरद भगत**

**दि.१६, सोमेश्वर (बारामती) :** श्री क्षेत्र सोमेश्वर येथे करंजे गावचे सोमेश्वर सेवाभावी संस्थेच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर आयोजित केले होते. या रक्तदान शिबिरासाठी सोमेश्वर पंचक्रोशीतील तरुणांनी हजेरी लावली होती. सोमेश्वर सेवा भावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव शिंदे व त्यांच्या मित्र मंडळीने हा कार्यक्रम आयोजित केला होता. या शिबिरामध्ये सुमारे युवक वर्ग व ग्रामस्थांनी ७५ बॉटल रक्तदान करुन मानवतेचा संदेश दिला आहे.

कार्यक्रमासाठी करंजे गावचे विद्यमान सरपंच भाऊसाहेब हुंबरे ,निरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बाळासाहेब शिंदे , सोमेश्वर देवस्थान ट्रस्टचे चेअरमन आनंद मोकाशी ,सचिव विपुल भांडवलकर, करंजे गावचे माजी तंटामुक्त अध्यक्ष संताजी गायकवाड ,विश्वस्त मोहन भांडवलकर, शिवाजी शेंडकर, प्रतापराव गायकवाड, सोमेश्वर देवस्थानचे पुरोहित ऋषिकेश घोलप आदी मान्यवर उपस्थित होते. रक्तदान शिबिरासाठी बालाजी ब्लड बँक सेंटर लोणंद यानीं विशेष सहकार्य केले. डॉक्टर अनिकेत उघडे ,समाधान माने -देशमुख जनसंपर्क अधिकारी, गौरी काळे टेक्निशियन, तसेच वैद्यकीय कर्मचारी यांनी सुरक्षितता, शिस्तबद्ध व वैज्ञानिक पद्धतिने रक्त संकलित केले.

## तुर्भे विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने तुर्भे विभागात अनधिकृत बांधकाम/ शेडवर निष्कासनाची कारवाई केली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभाग अंतर्गत मालमत्ताधारक हॉटेल विसावा, युनिट क्र.३, भूखंड. क्र. ६, सेक्टर १९ सी, तुर्भे, नवी मुंबई येथे समासी जागेत अनधिकृत बांधकाम/ शेड करुन त्याचा वाणिज्य वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अनधिकृत बांधकाम/ शेड ला महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम मधील तरतुदीनुसार नोटीस बजावण्यात आलेली होती.

# ई-गव्हर्नन्स क्षेत्रात नवी मुंबई महानगरपालिका महाराष्ट्रात प्रथम

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, नवी मुंबई :** महाराष्ट्रातील २९ महानगर पालिकांच्या ई-गव्हर्नन्स कामगिरीचे सर्वंकष मूल्यमापन करणाऱ्या पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन पुणे या त्रयस्थ संस्थेमार्फत जाहीर करण्यात आलेल्या City E-Governance Index (CEGI) 2026 अहवालामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने राज्यात प्रथम क्रमांकाचे स्थान पटकावून डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात ऐतिहासिक यश संपादन केले आहे. पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन पुणे यांनी प्रसिद्ध केलेल्या या अहवालामध्ये, प्रशासनातील पारदर्शकता आणि डिजिटल सुलभता या तीन प्रमुख स्तंभांवर आधारित शेकडो निकषांच्या आधारे मूल्यांकन करण्यात आले. यामध्ये पुणे महानगरपालिका दुसऱ्या क्रमांकावर आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची ही कामगिरी केवळ एक क्रमांक नसून ती आधुनिक, नागरिकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनाची साक्ष आहे. डिजिटल इंडिया, महाराष्ट्र ई-गव्हर्नन्स धोरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत अशा अनेक उपक्रमांमुळे हे यश शक्य झाले आहे.


महानगरपालिकेच्या विविध नागरिकाभिमुख ऑनलाइन सेवा, सुलभ डिजिटल व्यवहार, कार्यक्षम तक्रार निवारण प्रणाली तसेच www. nmmc.gov.in ही वेबसाईट आणि My NMMC या मोबाईल ॲपद्वारे उपलब्ध माहितीची सुसंगतता आणि अद्ययावतपणा यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेला हा मानाचा प्रथम क्रमांक प्राप्त झालेला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या या मानांकनाबद्दल महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत व महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी माहिती व तंत्रज्ञान विभागाचे कौतुक करीत महानगरपालिकेच्या यशाबद्दल नागरिकांचे अभिनंदन केले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाइन सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. नागरिक आता घरबसल्या प्रमाणपत्रे मिळवू शकतात, कर भरू शकतात, तक्रारी दाखल करू शकतात आणि त्यांच्या अर्जाची स्थिती ट्रॅक करू शकतात.

**ई-ऑफिस प्रणाली**

महानगरपालिकेने ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करून पेपरलेस प्रशासनाकडे वाटचाल सुरू केली आहे. फाईल हालचाली, मंजुरी प्रक्रिया आणि नोंदी डिजिटल माध्यमातून केल्या जात आहेत.

विविध विभागांचे एकत्रित व्यवस्थापन करण्यासाठी ERP आधारित प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे विभागांमधील समन्वयात सुधारणा झालेली आहे.




मागील वर्षांत नवी मुंबई महानगरपालिकेने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ई-गव्हर्नन्स क्षेत्रात सातत्यपूर्ण सुधारणा करत नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ ऑनलाईन सेवा देण्यावर विशेष भर दिला आहे. डिजिटल माध्यमांतून सेवा विस्तार, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, ट्रॅकिंग सुविधा, तसेच नागरिकांच्या सहभागासाठी विकसित करण्यात आलेल्या विविध प्लॅटफॉर्म्सचा सकारात्मक परिणाम या निर्देशांकात दिसून आला आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या ई-गव्हर्नन्स प्रणालीचा अभ्यास करताना पीआरओ संस्थेमार्फत प्रामुख्याने अधिकृत वेबसाईट, मोबाईल ॲप आणि सोशल मीडिया हँडल्स या माध्यमांचा विचार करण्यात आला. नवी मुंबईच्या कामगिरीचे विश्लेषण नागरिकांना आणि व्यवसायांना दिल्या जाणाऱ्या सेवांचे वितरण, सरकारी कामातील पारदर्शकता, सेवा वितरणातील सुलभता आणि उपलब्धतेची पातळी या तीन निकषांवर करण्यात आले.

१ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन या संस्थेच्या वतीने महानगरपालिकेची वेबसाईट, मोबाईल ॲप व समाज माध्यमे या खात्यांवरील माहितीचा अभ्यास करून निर्देशांक निश्चित करण्यात आला. मागील पाच वर्षांत २९ महानगरपालिकांनी ई-गव्हर्नन्स साठी केलेल्या कामांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला असून यावर्षी नवी मुंबई महानगरपालिकेने लक्षणीय कामगिरी करून ९.११ इतके गुणांक प्राप्त करीत थेट पहिल्या स्थानावर झेप घेतली असल्याचे पीआरओचे अध्यक्ष तन्मय कानिटकर यांनी पुणे येथील पत्रकार परिषदेत जाहीर केले आहे.

नागरिकांना नवी मुंबई महानगरपालिकेशी संबंधित माहिती व सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात असून नागरिककेंद्री, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासन हे नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्य ध्येय असल्याचे मत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केले आहे. ई-गव्हर्नन्सच्या क्षेत्रात राज्यात प्रथम क्रमांक मिळणे ही महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची पावती आहे. त्याचप्रमाणे यासाठी सहकार्य करणारे नागरिक यांचाही या यशात मोठा वाटा आहे. आगामी काळात एआय आधारित सेवा, सायबर सुरक्षा सक्षमीकरण आणि संपूर्ण पेपरलेस प्रशासनाच्या वाटचाल तसेच डिजिटल सेवा अधिक सक्षम आणि सर्वसमावेशक करण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील असे त्यांनी सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिका नागरिकांना अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असून ई-गव्हर्नन्स मध्ये राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये प्रथम क्रमांकाचे हे यश भविष्यातील नव्या उपक्रमांना अधिक गती देणारे ठरेल.